## प्रेसनोट

जा.क्र. ९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:– २०/ १ /२०१८

## गुन्हे आढावा बैठकी दरम्यान सत्कार

भंडारा :– पोलीस मिटींग हॉल पोलीस मुख्यालय भंडारा येथे आज दि. २०/०२/२०१८ रोजी गुन्हे बैठक घेण्यात आली जिल्हयातील सर्व १७ पोलीस स्टेशन कडुन मासीक अहवाल, तसेच वार्षिक गुन्हयाचा आढावा घेण्यात आला तसेच सर्व प्रकारच्या गुन्हयाविषयी आणि पोलीस स्टेशन स्तरावरील समस्या विषयी चर्चा करण्यात आली.

तसेच नियत वयोमानानुसार पोलीस दलातुन सेवा निवृत्त झालेले पोलीस उपनिरीक्षक मेश्राम म.स.फौ. तिरपुडे, स.फौ.वंजारी स.फौ. दुपारे, स.फौ. मडावी हे पोलीस दलातुन सेवानिवृत्त झाले मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांच्या हस्ते त्यांचे शाल,श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आले.

दिनांक १३/०२/२०१८ ला पो. स्टे. आंधळगाव येथील तैनातीस असलेले पो.शि. बेदुरकर बं. नं. १०८८, पो. शि. मस्के बं. नं. १३६८, पो. शि. लोकेश सिंगाडे बं. नं. १२५४, पो. शि. पेटे बं. नं. १३१९ यांनी महाशिवरात्री निमीत्त श्री. क्षेत्र गायमुख येथे बंदोबस्त डयुटी मध्ये असतांना श्री. अशोक पटले हे कुटुंबासोबत गायमुख येथे दर्शनाकरिता आले असता त्यांचे जॅकेट मधील खिश्यातुन पॉकीट अनावधानाने पडले. पॉकीटमध्ये रोख ४,७००/–रु. तसेच दोन ए.टी.एम कार्ड लायसंन्स व आधार कार्ड अशी महत्वाची कागदपत्रे होती. सदर पॉकीट हे आपणास पेट्रोलींग दरम्यान मिळाले. आपण माणुसकीचा परीचय देत सदरहू पॉकीट हे पोलीस चौकीत जमा करुन श्री. अशोक पटले यांचे स्वाधीन केले.

दिनांक ०७/०२/२०१८ ला कु. रविना शरद मेश्राम वय १७ वर्ष, रा. बेरोडी हिने १०.३० वा. वैनगंगा नदीच्या मोठया पुलीयावरुन नदीमध्ये उडी घेतली. त्यामुळे लोकांची गर्दी जमली त्याचवेळी प्रदीप बाळकृष्ण बन्सोडे वय ३५ वर्ष, रा. करचखेडा यांनी मोटार सायकल बाजुला घेवुन वैनगंगा नदीचे मोठया पुलीयावरुन स्वतःच्या जिवाची पर्वा न करता नदीत उडी घेतली. त्याचवेळी पो. स्टे. कारधा येथील तैनातीस असलेले पो. शि. प्रदीप बन्सोडे यांना नदीमध्ये उडी घेतांना बघीतल्याने येणाऱ्या एका ट्रकला थांबवुन त्याचे जवळून दोर घेवुन नदीमध्ये दोर टाकला. व त्या दोरच्या साहाय्याने त्या मुलीला नदीबाहेर काढले.

तसेच पाहण्याकरीता जमलेल्या गर्दीमुळे व पोलीस गाडी पोहचु शकत नसल्यामुळे समय सुचकता बाळगुन पो. शि. कमाने यांनी खाजगी वाहन थांबवुन मुलीला सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले.

यांच्या केलेल्या उत्तम कामगिरी व कर्तव्याबाबत मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू तसेच अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेट वस्तु देवुन प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आले.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र.९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.